| MHBI100010902020 | रे.दि.मु.नं. १७३/२०२० |
|---|---|
| | अक्षय शिनगारे व इतर<br>**विरुध्द**<br>धनराज साखरे व इतर |

## आदेश नि. १७ वरील

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी प्रतिवादी क्र. १३ हिस दाव्यामध्ये समाविष्ठ करण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. वादी यांनी सदर अर्जामध्ये असे कथन केले आहे की, प्रतिवादी क्र. ५ यांनी प्रकरण प्रलंबीत असताना दि. ०७.०८.२०२० रोजी वादग्रस्त सर्वे क्र. १०५ मधील १ हेक्टर जमीन खरेदीखत डे.बु.क्र. १४५७/२०२० अन्वये मारुती महादेव साखरे, रा. आवसगांव, ता. केज, जि. बीड यांना विक्री केलेली आहे. तसेच प्रतिवादी क्र. ४ यांनी दिनांक ०४.०८.२०२० रोजी सर्वे क्र. १०५ मधील ४१ आर जमीन खरेदीखत डे.बु.क्र. १४४७/२०२० अन्वये दिलीप अनंतराव पौळ, रा. मोटेगांव, ता. केज, जि. बीड यांना विक्री केलेली आहे. त्यामुळे मारुती महादेव साखरे व दिलीप अनंतराव पौळ हे आवश्यक पक्षकार आहेत. त्यामुळे दिलीप अनंतराव पौळ यांना प्रतिवादी क्र. ७ व मारुती महादेव साखरे यांना प्रतिवादी क्र. ८ म्हणून समाविष्ठ करण्याची विनंती वादी यांनी केली आहे. प्रस्तावित प्रतिवादी यांना समाविष्ठ केल्यामुळे दाव्याच्या स्वरुपात कोणताही बदल होत नाही. तसेच सदरच्या दुरुस्तीमुळे प्रतिवादींवर अन्याय होत नाही. उलट योग्य न्यायदान होण्यासाठी प्रस्तावित प्रतिवादी क्र. ७ व ८ यांचा समावेश होणे गरजेचे आहे. सबब, सदरचा अर्ज.

३. प्रतिवादींनी वादी यांच्या अर्जावर आक्षेप नोंदविताना योग्य तो आदेश करण्याची विनंती केलेली आहे.

४. वादी, प्रतिवादी यांचेतर्फे विद्वान वकिलांचा युक्तीवाद ऐकला.

५. वादी यांचा अर्ज व प्रतिवादींतर्फे दिलेले म्हणणे तसेच दोन्ही बाजूचा युक्तीवाद याचा विचार करण्यात येवुन खालील मुद्दे माझे विचारार्थ आले असुन त्यावरील निष्कर्ष खालील प्रमाणे नोंदविणेत आले आहेत–

| | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | प्रस्तावित प्रतिवादी क्र. ७ व ८ ला दाव्यात समाविष्ठ केल्यास दाव्यात अगर त्याचे स्वरुपामध्ये बदल होत आहे का ? | नाही. |
| २. | वादी यांचा सदरचा अर्ज मंजूर करणेस पात्र आहे का ? | होय. |
| ३ | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ ते ३ करिता –**

६. वादी यांचा अर्ज व प्रतिवादींतर्फे म्हणणे, तसेच दोन्ही बाजूच्या युक्तीवादाचा विचार करुन या कामातील दाव्याचे निरीक्षण केले असता असे दिसुन येते की, प्रस्तुतचा दावा मालकी हक्क घोषीत करुन कायम मनाई हुकूम मिळण्यासाठी दाखल करण्यात आलेला आहे. प्रस्तुत दावा हा प्राथमिक स्तरावर

प्रलंबित आहे. प्रतिवादी क्र. ४ यांनी प्रस्तावित प्रतिवादी क्र. ७ दिलीप अनंतराव पौळ यांना सर्वे क्र. १०५ मधील वादग्रस्त ४१ आर जमीन विक्री केलेली आहे. तसेच प्रतिवादी क्र. ५ यांनी प्रस्तावित प्रतिवादी क्र. ८ मारुती महादेव साखरे यांना वादग्रस्त सर्वे क्र. १०५ मधील १ हेक्टर जमीन विक्री केलेली आहे. त्यामुळे दिलीप पौळ व महादेव साखरे हे दाव्यामध्ये आवश्यक पक्षकार आहेत. प्रस्तावित प्रतिवादी क्र. ७ व ८ यांना दाव्यात समाविष्ठ केल्यास प्रतिवादी यांना कोणतेही नुकसान होईल असे दिसून येत नाही. उलट प्रतिवादी यांना वादी यांचा उलटतपास घेण्याची संधी आहे.

७. प्रस्तावित प्रतिवादी क्र. ७ व ८ यांना दाव्यात समाविष्ठ केल्यास मुळ दाव्यावर अगर त्याच्या स्वरुपामध्ये कोणताही बदल होणार नाही. उलटपक्षी दावा गुणदोषावर चालणेस मदतच होणार आहे. दिवाणी प्रक्रिया संहिता चे आदेश १ नियम १० अन्वये प्रस्तावित प्रतिवादी क्र. ७ व ८ हे दाव्यामध्ये आवश्यक पक्षकार ठरतात. त्यामुळे दाव्यामध्ये त्यांचा समावेश होणे दाव्याचा गुणदोषावर न्यायनिवाडा होणेसाठी गरजेचे वाटते. असे न झाल्यास दाव्यामध्ये गुंतागुंत वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. योग्य व संतुलित न्याय निर्णयाकरिता प्रस्तूतचा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. नैसर्गिक न्याय तत्वाचा विचार जरी केला तरी सदरचा अर्ज मंजूर करणे योग्य ठरते. येणेप्रमाणे वरील सर्व कारणमिमांसेचा विचार केला असता प्रस्तावित प्रतिवादी क्र. ७ व ८ यांना दाव्यामध्ये समाविष्ठ केल्यास दाव्यामध्ये अगर त्याच्या स्वरुपामध्ये कोणताही बदल होत असलेचे दिसुन येत नाही. त्यामुळे सदरचा वादी यांचा अर्ज मंजूर होणेस पात्र असल्याच्या निष्कर्षापर्यंन्त मी येत आहे. त्याप्रमाणे मुद्दा क्र.१ व २ यांचा निष्कर्ष तसा देवुन मुद्दा क्र.३ चा निष्कर्ष देणेकरिता मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे–

**रे.दि.मु.नं. १७३/२०२०**

**आदेश**

१. अर्ज रक्कम रुपये ५००/– (अक्षरी पाचशे रुपये फक्त) इतक्या खर्चावर मंजूर करण्यात येतो.

२. वादीने दिलीप अनंतराव पौळ व मारुती महादेव साखरे यांना दाव्यात अनुक्रमे प्रतिवादी क्र. ७ व ८ म्हणून समाविष्ठ करण्याबाबत योग्य ती तजविज करावी.

३. वादीने खर्चाची रक्कम पुढील तारखेपर्यंत प्रतिवादींना अदा करावी अन्यथा त्यांचा अर्ज आपोआप खारीज समजण्यात येईल.

SHEETAL VASANT PAWASKAR

Digitally signed by SHEETAL VASANT PAWASKAR
Date: 2022.11.03 17:49:49 +0530

दिनांक – ०३.११.२०२२

(एस. व्ही. पावसकर)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर, केज

CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file are word to word as per original judgment/ order.

Dictated on : 03.11.2022

Transcribed on : 03.11.2022

Checked & signed on : 03.11.2022

Sd/-

(P.V. Bhosale),
Stenographer Grade-3,
Ct. of CJJD and JMFC, Kaij.